सकाळ Today | ४
गोंदिया, सोमवार, १ ऑक्टोबर २०१८



गोंदिया : स्वच्छतेचे महत्त्व पटवून देताना देशमुख.

# कृषी विज्ञान केंद्रातर्फे स्वच्छताविषयक कार्यक्रम

गोंदिया, ता. ३० : १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान स्वच्छता पंधरवडाअंतर्गत हिवरा येथील कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने स्वच्छताविषयक कार्यक्रम राबविण्यात येत आहे. कार्यालय परिसर स्वच्छ ठेवणे, विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे, असे उपक्रम घेतले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून याअंतर्गत कार्यालयीन परिसर व बगीच्याचे सौंदर्यीकरण करण्यात आले. या वेळी कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. एन. एस. देशमुख, प्राचार्य डॉ. एस. ओ. बावकार, विषय विशेषज्ञ आर. डी. चव्हाण, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती सविता पुराम, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब मऱ्हाटे, भात पैदासकार डॉ. श्यामकुवर उपस्थित होते. चव्हाण यांनी शेतकरी तसेच कृषी विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालय, रतनारा येथे विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे देण्यात आले. या वेळी कार्यक्रम समन्वयक डॉ. एन. एस. देशमुख व गणेश खेडीकर यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर स्वच्छता जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाला एल. एस. लिल्हारे, आय. जे. घरपेले, पुरी, फंदे, गोखे, एस. एस. चवरे, के. एस. बन्सोड, आर. डी. चौधरी, एल. आर. चवरे, श्रीमती एम. एस. बोपचे उपस्थित होते. महिला आर्थिक विकास महामंडळ, तिरोडा येथे बचतगटांच्या महिलांची स्वच्छताविषयक चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कृषी विज्ञान केंद्र, हिवराच्या वतीने रतनारा व हिवरा गावातील शेतकरी महिला तसेच पुरुष यांना स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. या वेळी कृतिका गाडगे यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देताना त्यांचा आरोग्यावर होणारा परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आर. डी. चव्हाण यांनी शेतातील गवत, कचरा काढून स्वच्छ करावे, त्यामुळे पिकावरील किडींचे प्रमाण कमी होण्यास मदत होते, असे सांगितले, डॉ. सविता पवार यांनी शेतातील उपयोगी अवजारे यांची निगा राखावी, शेतातील कामे संपल्यानंतर अवजारे स्वच्छ करून ती व्यवस्थित झाकून ठेवावीत, असे सांगितले. संचालन गणेश खेडीकर यांनी केले.